## मा.न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी
**उच्च न्यायालय, मुंबई,**
**शनिवार, दि. १७ डिसेंबर, १९८३**

सन्माननीय कुलगुरू, अधिसभा, कार्यकारिणी, विद्याशाखा यांचे सन्माननीय सदस्य आणि मित्रांनो,

आजच्या दीक्षांत समारंभासाठी आमंत्रित करून आपण माझा जो गौरव केला त्याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

कोल्हापूर शहराची अनेक वैशिष्ट्ये आहेत. हे ऐतिहासिक शहर आहे. या शहरात व शहराच्या आसमंतात पुरूषार्थाची आणि कर्तृत्वाची प्रतीके विखुरलेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याचाच एक भाग म्हणून महाराणी ताराबाईंनी राजधानी म्हणून कोल्हापूरची स्थापना केली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्यामुळे या शहराला आगळे महत्त्व प्राप्त झाले. कला, क्रीडा आणि सामाजिक सुधारणा यांचे केंद्र म्हणून कोल्हापूरची महती आहे. हे शहर दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते. लोकमानसात येथील 'अंबाबाई'चेही अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक शुभ संकल्पांची ती अधिष्ठाती देवता आहे. साहित्यिक, कलावंत यांचे हे माहेरघर आहे. अशा या ऐतिहासिक भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने चालणाऱ्या विद्यापीठाने मला गौरवाने बोलाविले हा मी माझा मोठाच बहुमान समजतो. "History of a nation is a biography of its people" असे एक प्रसिद्ध वाक्य आहे. कुठल्याही देशाचा, प्रदेशाचा इतिहास तेथील नागरिकांच्या, तेथे राहणाऱ्या रहिवाश्यांच्या डोळ्यात लकाकत असतो. "Read the history of the Nation in the eyes of its people" असेही एका विचारवंताने नमूद करून ठेवले आहे. म्हणून मी आज या प्रदेशाच्या इतिहासाच्या खुणा आपल्या सर्वांच्या डोळ्यात, चेहऱ्यावर बघण्यास आलो आहे. शेवटी इतिहासाचे अध्ययन वर्तमानकाळात जगण्यासाठी आणि भविष्य कवेत घेण्यासाठीच करावयाचे असते. शक्ती काळाशी निगडित असते म्हणूनच इतिहासाचा शोध भविष्यकालीन पुनर्जीवनासाठी घ्यावयाचा असतो. याकरिता इतिहासासोबत वर्तमानाचे संशोधनही आवश्यक ठरते. या प्रदेशाच्या इतिहासाची खरी शिकवण ही आहे की, जे पूर्वी कधीच घडले नव्हते, व कधी काळी घडेल असेही वाटले नव्हते, तेही घडू शकते व घडवून आणता येते. या दृष्टीने आपल्या विद्यापीठाने केलेल्या कामगिरीचा अभ्यास व मजल दरमजल करीत गाठलेला पल्ला केवळ कौतुकास्पदच नाही तर स्पृहणीयही आहे.

आपले विद्यापीठ एकवीस वर्षांचे झाले आहे. त्याने तारूण्यात पदार्पण केले आहे. भारतीय राज्यघटनेची नागरिकत्वाची कसोटी लावली तर ते आज बालिग झालेले आहे. मला विद्यापीठापेक्षा विश्वविद्यालय हा शब्द अधिक आवडतो. कारण हे विद्यापीठ प्रादेशिक असले तरी त्याचा आवाका

विश्वाचा आहे. जागतिक आहे. पाय जमिनीवर असले तरी दृष्टी क्षितिजव्यापी आहे. पंखात गरूड भरारी मारण्याची ताकद असली की, मग आकाशही ठेंगणे वाटू लागते. क्षुद्र क्षेत्रवादाच्या गर्तेत पडून न राहता आपण मोठमोठे संकल्प हाती घेतले आहेत. क्रीडा, कला या क्षेत्रातही आपली प्रगती प्रशंसनीय आहे. "Earn and Learn" 'कमवा आणि शिका' या योजना राबवून आपण जीवन व शिक्षण यांचाही अनुबंध साधण्याचा प्रयत्न करीत आहात.

प्रादेशिक विद्यापीठे निघालीत. शिक्षणाचा विस्तार झाला. प्रत्येक तालुक्याच्या गावी महाविद्यालय निघाले. विद्यापीठाची व महाविद्यालयाची कवाडे सर्व सामान्यांसाठी उघडी झालीत. त्यामुळे आताशा एक नवीन वर्ण निर्माण होऊ पहात आहे. उच्चभ्रू लोकांचा. खालच्या थरातील लोक शिकून प्रगती करू इच्छितात म्हणून वरचा वर्ग संरक्षणाची भूमिका स्वीकारीत आहे. खालच्या वर्गाची अस्मिता जागी होत आहे. हे बघून वरचा वर्ग संरक्षणाचा पवित्राही घेऊ पहात आहे. त्यांना आता शिक्षणाच्या क्षेत्रातही standard ची दर्जाची काळजी वाटू लागली आहे. त्यांच्या मते शिक्षणाच्या प्रसारामुळे व विस्तारामुळे शिक्षणाचा दर्जाच खालावत चालला आहे. मित्रांनो, ही स्वार्थी भूमिका आहे. प्रस्थापितांना नेहमी दर्जाचीच काळजी वाटत असते. दहा लोकांसाठी शिजविलेल्या अन्नाचा दर्जा शंभर माणसांसाठी शिजविलेल्या अन्नापेक्षा नेहमीच चांगला असतो. म्हणून नव्वद माणसांना उपाशी ठेवून केवळ दहाच माणसांनी यथेच्छ जेवायचे काय? आजवर सर्वसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवून आपणच आप्पलपोटेपणाने शिकणाऱ्या या दर्जेदार उच्चभ्रू समाजाचाच दर्जा काय होता याचा कुणी विचारच करायला तयार नाही. अशा स्वार्थी समाजाला standard दर्जाच नसतो. ''पप्पा–मम्मी' च्या मुलांसाठी वेगळ्या संस्था व ''माय–बापा'' च्या लेकरांसाठी वेगळ्या संस्था अशी शिक्षणातील विषमता किती दिवस चालू देता येईल? सर्वांसाठी समान शिक्षण असावे असे आपणास वाटत नाही का? खरे म्हणजे देशभर सर्वांसाठी समान शिक्षण असावे म्हणून शिक्षण हा विषय राज्यघटनेत बदल करून आपण समवर्ती सूचित अंतर्भूत केला. तरीसुद्धा ही विषमता संपतच नाही. आचार्य विनोबा 'पब्लिक स्कूल'ची व्याख्या फार छान करीत, ''जी स्कूल पब्लिकच्या पैशावर चालते पण ज्या 'स्कूल' मध्ये पब्लिकला कधी जात येत नाही, मज्जाव असतो, ती 'पब्लिक स्कूल''.

आजही वैभव संपन्न शहरे कंगाल जीवनांनी भरलेल्या खेड्यांनी वेढलेली आहेत. आताशा रस्ते बांधले जात आहेत. विहिरी व तळीही खणली जात आहेत. पण या समाजविकासाच्या योजनेत समाज मात्र कुठेच नाही. अशावेळी श्रमजीवी किसानांच्या पाठीशी आपण बुद्धीनिष्ठांची शक्ती उभी करीत आहात, आपले ज्ञान, संशोधन व शिक्षण उत्पादनवाढीस सहाय्यभूत व्हावे अशा योजना राबवित आहात. आपले विद्यापीठ या भागातील लोकांच्या गरजा पूर्ण करणारे असे लोकविद्यापीठ आहे आणि हेच याचे वैशिष्ट्य आहे. या भागातील शेती, उद्योगधंदे इ. समस्यांशी निगडीत बाबींवरील

संशोधन करून सल्ला सेवायोजनामार्फत आपण जनतेशी सुखसंवाद निर्माण करीत अहात. राजेशाहीत 'राजदूत' जे काम करीत असतात ते काम आपले विद्यापीठ लोकशाहीतील 'लोकदूत' बनून करीत आहे. म्हणून आपल्या विद्यापीठाचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे.

आज पारितोषिक मिळालेल्या विद्यार्थ्यांचे, पदवीप्राप्त स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. हे अभिनंदन करतानाही माझ्या मनात एकप्रकारचा संकोच आहे, हे मला कबूल केले पाहिजे. कारण मीही मुलांचा बाप आहे. माझी मुलेही तुमच्याच वयाची आहेत. तेही तुम्ही शिकता तसलेच शिक्षण घेतात, त्यांनाही अशाच पदव्या मिळाल्या आहेत, मिळणार आहेत. ज्या ज्या ठिकाणी शिक्षणाचा विचार होतो, शिक्षणाबद्दल मते प्रदर्शित केली जातात, त्या प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र सदासर्वकाळ अगदी ज्येष्ठ व श्रेष्ठ पुढाऱ्यांपासून तो शिक्षणशास्त्रज्ञांपर्यंत सर्व एकच गोष्ट आवर्जून सांगतात आणि ती म्हणजे आजचे शिक्षण कुचकामाचे आहे, कालबाह्य आहे, संदर्भहीन आहे. असे विचार मी अनेक वर्षे ऐकत आहे. ज्यांच्या हाती शिक्षणपद्धती बदलण्याचे अधिकार आहेत तीच मंडळी असले विचार प्रकर्षाने मांडीत असतात. शिक्षण पद्धती बदलावयाची नाही, त्यात कुठलेही परिवर्तन घडवून आणावयाचे नाही. उलट याच पद्धतीचे शिक्षण देणाऱ्या नवीन संस्था काढावयाच्या, अशीच नवीन विद्यापीठे स्थापन करावयाची आणि तुम्ही जे शिकता ते कुचकामाचे आहे हेही विद्यार्थ्यांना परोपरी सांगावयाचे, असा हा कार्यक्रम चालू आहे. आम्ही शिक्षणपद्धती बदलणार नाही व तुम्ही जे शिकता त्यात तुमचे लक्ष लागू देणार नाही, अशी ही आत्मघातकी योजना आहे. हा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी चाललेला खेळ आहे, यांचा खेळ होतो. आणि पालकांचा, विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा जीव जातो. अनिश्चितता कायम ठेवायची, विद्यार्थ्यांचे शिक्षणात लक्ष लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण करावयाची व वर विद्यापीठात, शिक्षण क्षेत्रात शिस्त नाही, शैक्षणिक वातावरण नाही अशी आपणच तक्रार करावयाची, हा असा जीवघेणा खेळ किती दिवस चालणार आहे? म्हणून हा जीवघेणा खेळ थांबवा अशी पालक या नात्याने मी हात जोडून संबंधितांना जाहीर विनंती करू इच्छितो.

परंतु विद्यार्थ्यांपुरते बोलावयाचे झाले तर मी असे म्हणेन की कुठलेच शिक्षण कुचकामाचे नसते. प्रत्येक शिक्षणाचे स्वत:चे असे स्वतंत्र मूल्य असते. हिंदुस्थानातल्या स्वातंत्र्याचा लढा सुरू असतानाच शिक्षणाच्या बाबतीत नेत्यांनी एक विशिष्ट भूमिका स्वीकारली होती. १९०६ साली नॅशनल एज्युकेशन कमिटी कलकत्त्याला स्थापन झाली. या कमिटीचे सचिव योगी अरविंद होते. शिक्षणावरील सरकारी नियंत्रण व राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप याचा विचार करण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. लो. टिळक प्रभृतींही राष्ट्रीय संस्था उभारल्या होत्या. वर्धा शिक्षण योजनेच्या रूपानेही हा प्रश्न हाती घेण्यात आला होता. या माध्यमातून स्वराज्य व स्वदेशी बद्दलच्या आकांक्षा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यक्तीवर, समाज व राष्ट्र यांचे जे ऋण असते त्या

ऋणाच्या जाणिवेतून राष्ट्र व समाज यासाठी जगण्याची प्रेरणा मिळत असते. नवीन आकांक्षा निर्माण होते. यालाच राष्ट्रीय शिक्षणाची नवी दृष्टी मानण्यात येत असे. राष्ट्र आणि समाज यांच्या उत्थानाच्या आड येणाऱ्या अडचणी दूर करून पुढील काही वर्षात देशाला कुठले प्रश्न सोडवावयाचे आहेत याची निश्चित योजना आखून ते सोडवावयास लागणारे कर्तृत्व आशी बाणवण्यासाठी असे शिक्षण देण्याची आवश्यकता लोकनेत्यांना वाटत होती. आरामापेक्षा आझादी आणि सुखापेक्षा स्वातंत्र्य हे श्रेष्ठ आहे, हे विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवून त्यांचे मानसिक दौर्बल्य दूर करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय शिक्षणाद्वारे करण्यात आला. बौद्धिक पारतंत्र्याप्रमाणेच औद्योगिक पारतंत्र्यही नको, आणि स्वदेशीचा प्रसार व्हावा म्हणून औद्योगिक शिक्षण हे राष्ट्रीय शिक्षणाचेच अंग समजले गेले. पंजाब केसरी लाला लजपतराय यांनी राष्ट्रीय शिक्षणावरील पुस्तकात त्याचमुळे 'औद्योगिक शिक्षण' या विषयासाठी एक संपूर्ण प्रकरण खर्ची घातले अहे. राष्ट्राची ध्येये आणि शिक्षणाची ध्येये ही एकरूप झाल्याशिवाय राष्ट्रनिर्मिती होत नाही असा त्यामागचा हेतू होता. शिक्षणाचा विचार म्हणजे राष्ट्रीय पुनर्रचनेचा विचार असे मानले जात होते. नई तालीम ही माझी देशाला सर्वोत्तम व शेवटची देणगी आहे असे गांधीजी म्हणत.

म. गांधींचीही शिक्षणावर श्रद्धा होती. ते म्हणत की नफा नुकसानीचा हिशेब न करता देशाभिमान व देशभक्ती यांचा विकास करू शकेल असे शिक्षण असावे. या गोष्टींचा विचार बनिया वृत्तीने, सौद्याच्या विचाराने केला जाऊ नये असे ते मानीत. ही कल्पना स्पष्ट करीत असताना आमचे नेते प्रामुख्याने दोन मुद्दे मांडीत असत. एकतर राष्ट्रीय शिक्षण म्हणजे केवळ शिक्षणाच्या माध्यमातील बदल नव्हे. इंग्रजी ऐवजी मराठीतून गुलामगिरीचे स्तवन पाठ करणे म्हणजे राष्ट्रीय शिक्षण नव्हे. भाषेतील बदल हा आनुषंगीक तपशीलाचाच भाग आहे. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे केवळ विषयातील बदलही नव्हे. आजकाल शिकविल्या जाणाऱ्या विषयांपैकी काही विषय वाढविले व काही विषय कमी केले तर त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण होणार नाही. शिक्षणाचा आशयही मुळातच राष्ट्रीय असला पाहिजे. राष्ट्रांच्या आकांक्षा आणि राष्ट्राचे कल्याण यांचा मेळ घालण्याची जिद्द बाळगणारा नवा राष्ट्रवादी नागरिक निर्माण करण्याचा हेतू ज्यातून पूर्ण होईल, तो राष्ट्रीय शिक्षणाचा आशय असतो.

आमच्या नेत्यांचा दुसरा मुद्दा असा होता की वीस वर्षानंतर या राष्ट्राचे कोणते चित्र असावयास हवे, या भविष्यातील स्वप्नांचा आधार विद्यार्थी असतो. म्हणून शिक्षणाची दिशा, आज गरज कशाची आहे यावर ठरणार नाही, तर वीस वर्षांनी कशाची गरज लागणार आहे, हे आज ठरवून तसे शिक्षण द्यावे लागेल. कारण शिक्षण हे राष्ट्राच्या उभारणीचे महत्त्वाचे व पायाभूत साधन आहे. तत्कालीन क्षुद्र मुद्दे व स्थानिक क्षुद्र गरजा यातून मुक्त होऊन भावी पिढीचा व त्यांच्या जाणिवांचा विचार या क्षेत्रातील मंडळींनी केला पाहिजे. देशाभिमान आणि देशभक्ती यांचे मूल्य अंकगणितांनी आखता

येणार नाही. शिक्षणसंस्थांच्या बाबतीत म. गांधींचे असे स्पष्ट मत होते की, शिक्षण संस्था आंतर प्रांतीय सौहार्द निर्माण करून बंधुभावाची भावना निर्माण करणारे 'क्लब' बनले पाहिजेत. घर व शाळा यांच्या राहणीत अंतर न पडता, ज्यामुळे लोकांच्या गरजा पूर्ण होतील, असे शिक्षण असावे अशी त्या मागची भावना होती. समाजात समता व बंधुभाव निर्माण करण्यासाठी आखलेला तो एक राष्ट्रीय कार्यक्रम होता. नई तालीमचा असा विश्वास होता की ज्ञान व कर्म ही एकाच वस्तूची दोन स्वरूपे आहेत.

बुद्धी आणि शारीरिक श्रम यांचा मिलाप करून शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे आणि त्यासोबतच शिक्षणाच्या माध्यमातून अखिल भारतीय प्रवृत्तीचा विकास करणे, ही त्यामागची भूमिका होती. त्याचमुळे भारतीय राज्यघटनेचे प्रारूप ठरविण्यासाठी नेमलेल्या Drafting Committee ला लिहिलेल्या पत्रात त्यावेळचे शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी असा विचार व्यक्त केला की, सामान्य शिक्षण हा विषय प्रांताकडे सोपवू नये. एरवी भारतातील सुशिक्षित माणसालाही त्याच अनुषंगाने विचार करण्याची सवय लागेल. संपूर्ण देशासाठी अखिल भारतीयत्वाची भावना निर्माण करणारी समसमान शिक्षणपद्धती असावी हा या मागचा हेतू होता. आपल्या राज्यघटनेने अमेरिकन संविधानाप्रमाणे फेडरल राज्यपद्धती स्वीकारली असली तरीही अमेरिकेत अस्तित्वात असलेली 'दुहेरी नागरिकत्वा'ची कल्पना मान्य केलेली नाही. अमेरिकेत दोन प्रकाराचे नागरिकत्व आहे. एक विशिष्ट राज्याचे (स्टेटचे) व दुसरे अमेरिकन – अर्थात संपूर्ण देशाचे. आपण मात्र केवळ भारतीय नागरिकत्वाचीच कल्पना स्वीकारली आहे. तुम्ही रहिवासी कोल्हापूरचे असा; धर्माने हिंदू, मुसलमान, शीख अगर अन्य धर्मीय असा, तुमच्या भाषा भिन्न असतील पण तुम्ही नागरिक मात्र फक्त 'भारतीय'च आहात. शिक्षणाच्या विकेंद्रीकरणाची भूमिका जरी आपण स्वीकारली तरी भारतीयत्वाची शकले होणार नाही ही आपली खरी भूमिका आहे. याचा विसर पडू देता कामा नये.

आपल्या सारख्या अविकसित देशात वस्तूंचे उत्पादन आणि माणसांच्या गरजा यात प्रचंड तफावत आहे. शिक्षण उत्पादनवाढीस सहाय्यभूत व्हावे हे सर्वमान्य आहे. पण उत्पादन 'मकाना' करिता असेल की 'दुकाना' करिता असेल याचाही विचार करावा लागेल. शिक्षणाने निर्माण होणारे प्रश्न केवळ नोकऱ्या देऊन संपत नाहीत. Employment Oriented म्हणजे Functional व्यवसायाभिमुख शिक्षण फक्त विशिष्ट धंद्याचे शिक्षण नव्हे. पूर्वी सुताराचा मुलगा सुतार होत असे, कुंभाराचा कुंभार आणि चांभाराचा चांभार त्या ऐवजी आता वकीलाचा मुलगा वकिल व डॉक्टरचा डॉक्टर असा त्याचा अर्थ नव्हे. हल्ली युग विज्ञानाचे आहे. पण त्यालाही शाश्वत तत्त्वांची बैठक असावी लागते. क्षणिकाचे विज्ञान होत नसते. दुबळ्या क्षणभंगूर फोल तत्त्वांना विज्ञान म्हणता येणार नाही. म. गांधी म्हणत, त्याप्रमाणे शिक्षणातून अर्थार्जनाचे सामर्थ्य निर्माण व्हावे पण ते अर्थार्जन अगर

अर्थोत्पादनही काही नैतिक दृष्टीकोनातून झाले पाहिजे. शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम यातील तफावत दूर होऊन उत्पादक उद्योगांच्या माध्यमातून विद्यार्थी हा समाजाचा नीतीमान घटक बनावा ही त्यामागची विचारसरणी आहे. यातूनच चारित्र्याचा व नागरिकत्वाचा विकास होऊ शकतो.

समाजवादामध्ये जीविकेच्या पद्धतीवर माणसाची संस्कृती अवलंबून असते हे कार्ल–मार्क्सचे म्हणणे खरे मानायचे असेल, तर उत्पादनाच्या प्रक्रियेतून माणसाची शक्ती, त्याची कला व समाजशीलता यांचा विकास झाला पाहिजे. यालाच व्यक्तित्त्वाचा विकास म्हणता येईल. मनुष्याची जीविका जशी असेल तसेच त्याचे जीवन बनत असते. म्हणूनच आपण पोटापाण्याच्या व्यवसायाला 'उपजीविका' म्हणत असतो. 'उपजीवन' व 'उपजीविका' यांच्या साधनातही क्रांती व्हावी लागेल. आज शिक्षण ही विक्रीची वस्तू बनली आहे. शिक्षणसंस्था विक्रीची केंद्रे ठरू पाहत आहेत. धर्म, कला, साहित्य, शिक्षण सर्वांवर किंमतीचे लेबल लावण्यात येत आहे. आक्रोशकारी दुकानदारीमुळे आज ज्ञान विज्ञान, इमान, इन्सान, एवढेच नव्हे तर भगवानही विक्रीच्या वस्तू ठरू पाहत आहे. साऱ्यांचाच बाजार मांडला जात आहे. ऑस्कर वाईल्डने सिनीक या शब्दाची व्याख्या, "A man who knows the price of every thing & the value of nothing" या शब्दात केलेली आहे. शेवटी हा मूल्यांचा संघर्ष आहे. 'किंमत' आणि 'मूल्य' हे भिन्न अर्थी शब्द आहेत. किंमत बाजारात मागणी आणि पुरवठा किंवा क्रयविक्रयाच्या अर्थशास्त्रीय सिद्धांतावर ठरत असते, तर मूल्य आपल्या पायावर उभे असते. मूल्याला आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी इतर आधाराची गरज नसते. त्यामुळे शिक्षणाची किंमत बाजारातील सिद्धांतानुरूप ठरविणे शक्य नाही. माझे वडील (दादा धर्माधिकारी) या संबंधात एक दाखला देतात. आपण डेअरीचे दूध जे बाटलीतून विकत घेतो, त्याची बाजारात किंमत आहे. अमूल, ग्लॅक्सो या दूध पावडरीलाही बाजारात किंमत आहे. कारण हे सारे दूध विकले जाते व खरीदले जाते; किंबहुना ते विक्रीसाठीच असते. पण बाजारात आईच्या दुधाला काहीच किंमत नाही. कारण ते विकले जाऊ शकत नाही व खरीदले जाऊ शकत नाही. त्याचे मूल्य अनमोल आहे. शिक्षण हे मातेच्या दुधासारखे आहे. परंतु दुर्दैवाने आजचे शिक्षण परंपरावादी बाजाराची मूल्ये बदलू शकले नाही. उलट त्या मूल्यांच्या समर्थनाचे साधन बनू पाहत आहे. त्यात भर Security वर, सुरक्षिततेवर आहे, स्वातंत्र्यावर नाही. खऱ्या अर्थाने समाजरचना बदलण्याचे साधन हे शिक्षणाचे खरे मूल्य आहे. प्रस्थापित समाजात मानाचे स्थान मिळविण्यासाठी शिक्षणाचा उपयोग ही शिक्षणाची खरी फलश्रुती नव्हे. रक्षण, पोषण आणि शिक्षण यांचा अनुबंध कुठेतरी साधावा लागतो. त्यामुळे कला, व्यायाम व खेळ यांनाही शिक्षणात स्थान असावे लागते. खेळातून खेळाडू वृत्तीचा विकास होतो. खेळाडू वृत्ती हे अलौकिक अध्यात्मिक मूल्य आहे. खेळाच्या क्षेत्रात प्रतिस्पर्ध्यालाही आमंत्रण दिले जाते. त्याचे स्वागत होते व सत्कार होतो. प्रतिस्पर्धी सवंगडी बनतो. खेळात match असते, war

नसते. कुस्तीत सुद्धा दोन मल्लांची हृदये एकमेकांसोबत गुंफावी लागतात. छातीला छाती लागल्याखेरीज कुस्ती रंगत नाही. कुस्ती जिंकणारा जिंकतोच पण हरणाराही अल्प यशस्वी होत असतो, नामोहरम कुणीच होत नाही. हरणाऱ्याला बक्षीस मिळत नाही, पण मानाचा नारळ मिळतो. यातूनच सर्व क्षेत्रात प्रतिस्पर्ध्याबद्दल आस्थेच्या आणि सौहार्दाच्या भावनेने जगण्याचे वळण लागते. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे, तर ते संजीवनाचे उपकरण आहे. केवळ entertainment नव्हे तर recreation पुनर्जीवन हे त्याचे अधिष्ठान आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात मूल्य जर आपण प्राणभूत करू शकला तर आजच्या समाजाचे चित्र बदलण्यास बरीच मदत होऊ शकेल.

एकूण काय की, जीवनात खेळणी व अवजारे यांचा अनुबंध निर्माण करण्यासाठी उत्पादक परिश्रमाची शिक्षणाला जोड असावयास हवी. फक्त Bread Labour नव्हे. फक्त भाकरीसाठी काम नव्हे. मला जेवावयाचे नसले तरी मी उत्पादक परिश्रम करीन हा त्यामागचा खरा संकल्प. त्याचमुळे उत्पादक शारीरिक श्रम हे एक व्रत आहे, मानवी मूल्य आहे असे म. गांधी मानीत. इतर कुणासाठी काहीतरी करावे ही मानवी मनाची स्वाभाविक प्रेरणा आहे. असा माणूस कधी सगासोयरा असतो, कधी शेजारी असतो, तर कधी देशबांधव असतो. माणुसकीच्या नात्याने परस्परांशी जोडलेला.

शिक्षणसंस्था म्हणजे विशिष्ट ठशाची माणसे निर्माण करणारे कारखाने नव्हेत. एकाला घडलेले दर्शन दुसऱ्याला उधार उसनवार देता येत नाही. उडणारा पक्षी आपले पंख इतरास देऊ शकत नाही. प्रत्येकाला स्वतंत्रपणेच धडपड करावी लागते. रवींद्रनाथांनी 'स्नेहग्रास' नावाच्या सुनीतात बालकविषयी मातेला केलेला उपदेश या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखा आहे. रवींद्रनाथ म्हणतात, ''माते बालक हे स्वत:चे, विश्वाचे व विश्वदेवतेचे आहे. बालक ही तुझी खाजगी संपत्ती नव्हे' अशाच अर्थाचे विचार पाश्चिमात्य दार्शनिक खलील जिब्रान यांनीही व्यक्त केले अहेत. ''बालके म्हणजे चिरंजीव होऊ इच्छिणाऱ्या जगज्जीवनाच्या उत्कट कामनेचे कन्यापुत्र होत. तुम्ही त्यांना आपले प्रेम द्या, पण आपल्या विचारांच्या शृंखला त्यांच्या पायात अडकवू नका, कारण त्यांना त्यांचे विचार असतात. त्यांच्यासारखे बनण्याचा तुम्ही प्रयत्न करा, पण त्यांना तुमच्यासारखे बनवू नका. कारण जीवन मागे कधी उफराटे जात नाही आणि भूतकाळासोबत रेंगाळतही नाही.' वास्तविक पाहता मागच्या पिढीच्या अपुऱ्या राहिलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी भगवंत नव्या पिढीला जन्माला घालत असतो. म्हणूनच तरूण पिढी म्हणजे पुढे जाणाऱ्या जीवनाचे प्रतिनिधी ! त्यांना जीवनात प्रगतीपथावर पुढे जाताना सोबत 'पाथेय' अगर पुरेशी 'शिदोरी' असावी हेच खरे अभ्यासाचे प्रयोजन आणि हीच विद्यापीठाची भूमिका !

आचार्य विनोबा म्हणतात त्याप्रमाणे हल्लीच्या चमत्कारिक शिक्षणपद्धतीमुळे जीवनाचे दोन तुकडे पडतात. आयुष्याची पहिली वीस–पंचवीस वर्षे मनुष्याने जगण्याच्या भानगडीत न पडता

नुसते शिक्षण घ्यायचे आणि नंतर शिक्षण गुंडाळून ठेवून मरेपर्यंत जगायचे. शिक्षण व जीवन याचा संबंध नाही, अनुबंध नाही. फ्रान्समध्ये विद्यार्थ्यांची एक मोठी चळवळ झाली, त्यावेळी एक पोस्टर लावण्यात आले : ''ही कसली शिक्षणपद्धती, जी लहानपणापासून स्पर्धाच स्पर्धाच शिकविते.'' त्या विद्यार्थ्यांच्या मते या शिक्षणातून सहजीवनाची अगर सहयोगाची वृत्तीच निर्माण होत नाही. डॅनिएल क्रॉन बेडिक्ट हा पाश्चिमात्य राष्ट्रात झालेल्या विद्रोहाचा नेता ! त्याने तक्रार केली, की प्रस्तुत शिक्षणामुळे समाज एका साच्याचा बनत चालला आहे. केवळ नोकरीनिष्ठ समाज ! तो म्हणाला "Many students are becoming increasingly disgusted and sickened, not only by this system but by the very culture that produces and tosters it." अशा तऱ्हेने शिक्षण पद्धतीचा विरोध हा एक अर्थाने समाज रचनेचा विरोध असतो. प्रस्तुत शिक्षण परंपरावादी मन बदलू शकले नाही. उलट परंपरा टिकविण्याचे त्यांच्या समर्थनाचे साधन बनू पाहत आहे, हीच तर खरी तक्रार आहे. करूणेशिवाय शिक्षणाला अगर जीवनाला पूर्तता येत नाही. आज नीतीमत्ता बिघडल्यासारखी वाटते कारण तिचे अधिष्ठान पैसा आहे, श्रम अगर ज्ञान नाही. त्या विद्यार्थी चळवळीची आकांक्षा आमूलाग्र समाज परिवर्तनाची होती. केवळ डागडुजी करण्याची नव्हती. जगातील क्रांतिदर्शी युवकांनी प्रस्थापित समाजरचना बदलण्याचा विडा उचलला आहे. त्यात शिक्षण संस्था व विद्यापीठे यांची काय भूमिका राहील हा खरा यक्ष प्रश्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे चालणाऱ्या या विद्यापीठातून किती I.A.S. अधिकारी निर्माण झाले, किती इंजिनिअर्स, डॉक्टर्स बाहेर पडले, या आकड्यात मला फारसा रस नाही, तर प्रस्थापित समाजरचनेच्या विरूद्ध बंड करून उठणारे किती शिलेदार अणि मावळे निघालेत हे माझ्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे.

आजच्या शिक्षणपद्धतीस तीन रोग जडलेले दिसतात. त्यांना मी त्रिदोष म्हणतो. एक झोपलेला पालक, दोन नकोसे झालेले विद्यार्थी आणि तीन बिचारे शिक्षक. अर्थात या रोगांची व दोषांची मुख्य जबाबदारी आजच्या प्रयोगवीर शासनाची आहे. कविवर्य मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे, ''आम्हास आम्ही पुन्हा पहावे । काढुनी चष्मा डोळ्यावरचा ।।'' एवढीच माझी याबाबतची भूमिका आहे. रोग बरा करण्यासाठी रोग्यालाच मेहरबानी करून मारू नका एवढीच विनंती आहे.

आपल्या देशाची लोकसंख्या वाढली हे खरे आहे. कुटुंब नियोजन असावे याबद्दल दुमत नाही. परंतु जन्माला आलेले मूल नकोसे व्हावे ही आजच्या पिढीची भूमिका बदलणे अत्यावश्यक आहे. मागच्या पिढीच्या हातून इत:पर प्रगती होणे शक्य नाही, हे जेव्हा भगवंताच्या ध्यानात येते तेव्हाच तो नवीन पिढीला जन्म देत असतो. ही नवीन पिढी मागच्या पिढीच्या खांद्यावर बसून येते म्हणून तिच्या विचारांचे क्षितिज व्यापक असते. मूल हवे की नको हे ठरविण्याचा अधिकार मातापित्यांचा आहे, पण झालेल्या मुलाचे मात्र स्वागतच व्हायला हवे. लोकसंख्या अफाट झाली म्हणून या पिढीकडे दुर्लक्ष

होऊ नये. प्रगतीच्या मार्गावर पिढ्यांची रिले रेस चालत असते. माझी वेदना अशी आहे की, पुढच्या पिढीसाठी जगण्याची आकांक्षा बाळगणारे, जगणारे आईबापच आज अस्तित्वात नाहीत. नातवंडांना आंबे खायला मिळावेत म्हणून आंब्याची झाडे लावणारे आजोबाच दिसत नाहीत. आजची पिढी 'हायब्रीड'ची होऊ पाहत आहे. त्यामुळे मुलांकडे आणि मुलांच्या एकूण जीवनाकडे आम्ही पालक अक्षम्य दुर्लक्ष करीत आहोत. प्रत्येकाची एकच तक्रार, ''मुले बिघडली, मुले ऐकत नाहीत' मित्रांनो मुले बिघडलेली नसतात, बिघडलेले असतात आईबाप. चारित्र्यवान व चांगले आईबाप मिळणे ही योगायोगाची बाब ठरू पाहत आहे; आणि तक्रार मात्र मुले ऐकत नाही अशी करण्यात येत आहे. एकदा माझ्या वडिलांकडे मुलगा ऐकत नाही अशी तक्रार घेऊन एक पालक आले. माझे वडील म्हणाले, '' ''ही तक्रार खरी असेल तर मला फार आनंद होईल'' मी ऐकत होतो. मी बुचकाळ्यात पडलो. मी वडिलांना म्हणालो, ''मुलगा ऐकत नाही यात आनंदाचा भाग तो कोणता?'' तेव्हा त्यांनी मला प्रतिप्रश्न केला की, ''या देशात आईबापाचे ऐकणारीच मुले जन्माला आली असती तर या देशाला कधी स्वातंत्र्य मिळाले असते का? या देशाच्या स्वातंत्र्यासाठी फासावर लटकणारे शहीद आईबापांचे न ऐकणारे बंडखोर होते.''मुलगा बापाची कार्बनकॉपी किंवा पॉकेट एडिशन व्हावी ही इच्छाच अमानवीय आहे. आपला मुलगा जमदग्नीची आज्ञा ऐकून रेणुकेची गर्दन छाटणारा परशुराम व्हावा की अन्यायाच्या प्रतिकारासाठी सख्ख्या बापाविरूद्ध बंड करून उठणारा भक्त प्रल्हाद व्हावा, हे आपणास कधीतरी ठरवावे लागेल.

पालक हे कॉलेज विद्यार्थ्यांच्या बाबतीत अक्षरश: झोपलेले आहेत. माझा मुलगा कुठल्या कॉलेजात जातो हे मला माहीत आहे, पण त्याने कुठले विषय घेतलेत याबद्दल मी अनभिज्ञ असतो. एकदा माझी मुलगी चांगली मेरिटमध्ये पास झाली. तेव्हा तिच्या शिक्षकांनी येऊन मला तसे सांगितले. ते ऐकून मी सहजगत्या म्हणालो, ''मेरिटमध्ये येणारच होती. कारण घरचे वळणच तसे आहे.' एकदा माझा मुलगा चांगला पास झाला नाही. तेव्हा शिक्षक म्हणाले, ''आपण याच्याकडून अभ्यास करून घेतला पाहिजे''. मी उत्तर दिले, '' हे असेच चालणार, कारण तुम्ही शिक्षक आजकाल मन लावून शिकवीतच नाही.'' म्हणजे श्रेय पालकाचे व अश्रेय शिक्षकाचे व शिक्षणसंस्थांचे अशी पालकांची वृत्ती आहे.

शिक्षकांच्या बाबतीत समाजाची व शासनाची भूमिकाही अनुदारतेची आहे. शिक्षक कुणीही होऊ शकतो. तो नेहमी बिचारा व लाचार असावा अशी आमची भावना आहे. नोकरी टिकावी म्हणून त्याने सदोदित सत्ताधीश, संस्थेचे पदाधिकारी यांचीच नव्हे, तर विद्यार्थ्यांचीही करूणा भाकावी, याचना करावी अशी आमची अपेक्षा असते. माझ्या मामांना शंकरपटाचा छंद होता. शंकरपटासाठी बैलजोडी हाकण्यासाठी 'धुरकरी' निवडताना ते खूप काळजी घेत. एकदा तर त्यांनी २५ जणांच्या

मुलाखती घेतल्या. मी त्यांना म्हटले, ''बैलच तर हाकायचे आहेत ना, त्यात इतके विचार करण्यासारखे काय आहे?'' तेव्हा त्यांनी उत्तर दिले ''अरे, धुरकरी चांगला नसेल तर बैल 'इचकून' जातो.'' मी नव्याने मोटार घेतली, तेव्हाही वाहन चालक नेमताना वाहन चालकाच्या मुलाखती घेतल्या. त्याला गाडी चालवण्याचा अनुभव आहे काय, गाडी चालवताना अपघात घडले आहेत काय, दारू पितो का आदी सारे प्रश्न विचारले. मोटार, बैल बिचकतील याची आम्ही जितकी काळजी घेतो तितकी काळजी शिक्षक नेमतान मुलं बिघडतील याची घेत नाही. उलट तो आपल्या कह्यातला असावा, आपला माणूस असावा असा हट्ट असतो.

पतंजली परमेश्वराला गुरुरूपात पहात असत. आईचे वात्सल्य शिक्षकाच्या ठिकाणी असावे, तो निरंतर अध्ययनशील असावा व तो राजकारणापासून अलिप्त असावा हे खरे शिक्षकाचे गुण! ज्ञान व कर्म यांचा योग साधून श्रमशक्तीला ज्ञानाची जोड लाभावी म्हणून किसान व मजूर या क्रांतीच्या अग्रदूतांसोबत हृदयाने व बुद्धीने संपन्न परंतु सर्वस्वी निर्भय असा शिक्षक उभा राहावा, हा आजच्या काळाची गरज आहे. शासन व्यवस्थेवर प्रभाव पाहून त्यावर अंकुश ठेवू शकतील असे 'यती' शिक्षकातून निर्माण व्हावयास हवेत. जुन्या काळी वशिष्ठ ऋषींवर जशी राजांची– सम्राटांची सत्ता चालत नव्हती आणि गुरुवर्य वशिष्ठ जसे शासनापलीकडले मानले जात तद्वतच प्राध्यापक आणि शिक्षकांवर शासनाची सत्ता आणि कुरघोडी चालणर नाही अशी योजना असावी लागेल व त्यासाठी निष्ठावान शिक्षकांच्या पाठीशी नागरिकांची शक्ती उभी करावी लागेल. स्वतंत्र न्यायसंस्था हा लोकशाहीचा प्राण असेल तर स्वतंत्र, शासनमुक्त शिक्षणसंस्था हा लोकशाहीचा आत्मा आहे, हे विसरून चालणार नाही.

आपण आज स्नातक–पदवीधर झालात. मुलींनाही पदव्या मिळाल्या, पारितोषिके मिळालीत. आज आपल्या मुलीबद्दल तिच्या आईवडिलांना भूषण वाटले असेल. पण असे प्रसंग मुलीच्या आईवडिलांच्या जीवनात दुर्मिळ असतात. आपला देश देवीपूजक आहे, आपल्या राज्यघटनेप्रमाणे स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे समान अधिकार मिळाले आहेत. या देशाची पंतप्रधान स्त्री आहे, स्त्री न्यायमूर्ती होऊ शकते. शिक्षण क्षेत्रात तर गुणवत्ता यादीत मुलींची संख्या अधिक दिसते. इतके असूनही आज सुद्धा घरी मुलीचा जन्म झाला तर तिच्या आई–बापांना वाईट वाटते, ही स्त्रीची प्रतिष्ठा आहे. अंबाबाई महालक्ष्मीचे दैवत ज्या करवीर क्षेत्री आहे, तेथेही हीच परिस्थिती विद्यमान आहे. मुलीचा बाप म्हणून माझी ही वेदना आहे की, ही परिस्थिती कधीतरी बदलली पाहिजे. एरवी शिक्षणातील प्राणच निघून जाईल. सतीच्या सतीत्वालाच अर्थ उरणार नाही. सहशिक्षणातून पावित्र्य कसे निष्पन्न होईल याची जबाबदारी साऱ्यांवर आहे. स्त्री बद्दलची आदराची भावना ज्या समाजात अगर शिक्षणसंस्थात

नसेल त्या शिक्षणसंस्थांमधून शाबूत अंताकरणाचे नागरिक निपजणे शक्य नाही.

आपले विद्यापीठ एकवीस वर्षांचे झाले. त्याने तारूण्यात पदार्पण केले आहे. आपण सारे पदवीधरही तरूण आहेत. मी 'तारूण्याचे तीन तकार' मानतो.

**तेजस्विता, तपस्विता आणि तत्परता**

तेजस्विता म्हणजे वीरवृत्ती, वैरवृत्ती नव्हे. तेजस्विता म्हणजे अन्यायाचा प्रतिकार करण्याची निष्ठा. आज लोकांना अन्याय भ्रष्टाचार सहन करण्याची सवय जडली आहे. अन्याय आणि भ्रष्टाचार यांच्याशी समझोते करत जगण्याची आकांक्षाही निर्माण होऊ पाहत आहे. युनेस्कोच्या डायरेक्टर जनरलने दोन पिढ्यात तफावत का आहे, याबद्दल विचार व्यक्त करताना म्हटले आहे, "The gulf between young and adult seems to be growing everyday not only with university but with society as a whole. With their needs for absolutes, the young are less than ever able to tolerate injustices and disorder of this world." एकूण काय की अन्याय सहन करण्याची क्षमता व या क्षमतेतील तफावत यावर दोन पिढ्यांमधील अंतर अवलंबून आहे. समाजातील धार्मिक, आर्थिक, सामाजिक अन्यायाविरूद्ध बंड करून उठतो तो खरा तरूण ! म्हणून लॉर्ड ब्रॉडहम म्हणतात तीच खरी शिक्षणाची कसोटी : "Education makes people easy to lead but difficult to drive. Easy to Govern but impossible to enslave." शिक्षणानंतर माणसाला मार्गदर्शन करणे सोपे जाते, पण माणसांना गुरांप्रमाणे हाकता येत नाही. त्यांचे नियमन करणे सोपे पण त्यांना गुलाम बनविणे अशक्य होते. अशी शिस्तबद्ध तेजस्वी वृत्ती निर्माण करणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे. सर्व प्रकारच्या भीती व गुलामगिरीपासून मुक्त करते तेच खरे शिक्षण ! गुलामगिरी म्हणजे अब्रुदार माणसाला जिवंतपणी येणारा मृत्यू. एका इंग्रज लेखकाने म्हटल्याप्रमाणे, "Fear is darkroom where all negatives are developed." भीती ही अंधारकोठडी अहे. जेथे केवळ नकारात्मक वस्तूंचाच विकास होत असतो. भीती व नीती एकत्र नांदू शकत नाही. म्हणून भीत भीत सत्य, ससत्य व न्याय अन्यायाशी समझोते करीत न जगता पुरुषार्थाने अन्यायाशी सामना करणे हीच खरी वीरवृत्ती.

ज्योतिष, जोगिया व जुगार यापासून दूर राहण्याची आकांक्षा म्हणजे तपस्विता; म्हणजेच तितिक्षा. तपाने अगर तितिक्षेने मोह जिंकता येतात. मी कष्ट सहन करीन, तत्त्वासाठी अगर जीवनमूल्यांसाठी. 'गरीबी' पत्करेन पण वाईट मार्गाने कमाई करणार नाही. किमान एवढे पथ्य तरी आजच्या तरूणांना पाळता आले पाहिजे. एकदा हरामाच्या कमाईची सवय झाली की रामची कमाई चालत नाही, त्याने मन भरत नाही, पोटही भरत नाही आणि मग जीवनात भ्रष्टाचाराला सुरुवात होते.

तत्परता म्हणजे पत्करलेल्या कार्याशी तदाकार होण्याची वृत्ती. ज्याने अन्यायाच्या प्रतिकाराचे

व्रत स्वीकारले आहे त्याच्या निष्ठेचे हे स्वरूप आहे. आज समाजाला अशा तत्परतेची गरज आहे. आजचा तरूण सामाजिक संघर्षाबाबत, अन्यायाबाबत बघ्याची भूमिका घेतो आहे. जणू आपण त्या गावचेच नाही अशी त्याची धारणा आहे. कुंपणावर बसून तो गंमत बघू इच्छितो. तरूणांनी भरलेल्या बसमध्ये, त्यांच्यासमोर, त्यांच्यादेखत स्त्रीचा विनयभंग होतो; चोर मंगळसूत्र ओढतो, गुंडगिरी करतो. अनेकदा यात तरूणांचाही समावेश असतो. एक नवीन स्ट्रीट कॉर्नर 'street corner' सोसायटी निर्माण होऊ पाहत आहे. 'हिप्पी कल्ट' वाढत आहे. आणि आपण सारे नुसते बघ्याची भूमिका घेत आहोत. जणू कुणी कुणाचा लागतच नाही. कुठल्याही क्षेत्रात बांधिलकीची भूमिका नाही, मग सामील होणे तर दूरच राहिले ! पददलित, दुर्लक्षित यांच्याबद्दल आस्था नाही. सिनेमा, कादंबऱ्यातील दुःख पाहून अगर वर्णने वाचून सदगदित होणारी, अश्रू ढाळणारी ही तरूणी पिढी रोज रस्त्यावर पावलोपावली दिसणारे दुःख व अन्याय सहन करू शकते. कारण या साऱ्या दुःखाशी तदाकार होण्याची वृत्ती नाही. मला बिर्लासारखी संपत्ती मिळावी ही वासना आपण सदैव बाळगतो. पण माझ्यासारखे सुख भंग्यालाही मिळावे असे आपणास मुळीच वाटत नाही. केवळ समभाव पुरेसा नाही. त्यामागची 'ममभावाची' आवश्यकता असते. इंग्रजीत एक सुरेख वाक्य आहे, "While there is a lower class, I am in it. While there is a criminal element, I am of it, and while there is a soul in Prison, I am not free. समाजात जोवर दलित वर्ग आहे, तोवर मी त्यातला आहे. अपराधी आहे तोवर मी त्यांच्यातला आहे. आणि जोवर एकही माणूस बंधनांनी जखडलेला आहे, तोवर मी देखील स्वतंत्र नाही. हीच खरी करूणेची भावना. यालाच मी आस्तिक भावना म्हणतो. हेच खरे साधुत्व. हेच खरे अध्यात्म. खरे म्हणजे हाही मूल्यांचाच संघर्ष आहे. समाजातील अन्याय, पददलित, दुर्लक्षित यांच्याबद्दल आस्था व प्रचलित असंतुलनाबद्दलची चीड व त्यातून निर्माण होणारा पुण्यप्रकोप म्हणजेच खरी तदाकारवृत्ती.

मी तुमचा बराच वेळ घेतला. पण एका पित्याने आपले हृदय आपल्या मुलांसमोर उघडे करावे या भूमिकेतून मी काही विचार तुमच्यासमोर मांडले. माझी वेदना तुमच्यापुढे मांडली. कारण आजची तरूणपिढी हेच आमचे आशास्थान आहे. मला या ठिकाणी रोमारोलांच्या एका वाक्याची आठवण होते;

"You are the hope of the world, the seed of the future classless society of all humnanity - a society without exploitation of man by man, without frontiers between the states, without hatred between races and people."

तुम्ही म्हणजे जगाची आशा. ज्या समाजात आपल्या स्वार्थासाठी माणूस दुसऱ्या माणसाचे शोषण करणार नाही. ज्या राज्याराज्यात कृत्रिम सीमा उरणार नाहीत, ज्यात जाती जमातीत द्वेष राहणार नाही अशा अखिल मानवतेचे, वर्गहीन समाजाचे बीजारोपण तुमच्या हातून व्हावयाचे आहे. हे सारे कसे घडून येईल हे सांगण्याचा माझा अधिकार नाही. त्याचे रेडिमेड नुक्से किंवा फॉर्म्युलेही

नाहीत. 'हमरस्ता' ही नाही. दरेकाला विचार करून आपली पाऊलवाट स्वत:च निवडावी लागेल. या संदर्भात मी आपले लक्ष कै. सरोजिनी नायडूंच्या प्रसिद्ध काव्यपंक्तीकडे वेधू इच्छितो.

त्या कवितेचा भावार्थ असा आहे –
मी एक भटकी गायिका आहे...
माझ्या खांद्यावर कावड आहे
दोन बोचकी बांधलेली
एकात आहे स्वप्ने, एकात आहे आशा !
हीच माझी संपत्ती
साबरमतीच्या तीरावर
मातीच्या झोपडीत
स्वत:च दरिद्रीनारायण बनून
तो नि:स्वार्थी ऋषी तुम्हाला
साद घालीत आहे,
जुलमाविरूद्ध लढायला.
आपल्या शस्त्रागारात मशीनगन नको
तलवार नको
तुमचा अजय आत्मा बंड करून
उठला ना, की बस्स !

वयाच्या चौदाव्या वर्षी स्वातंत्र्यआंदोलनात भाग घेतला तेव्हा माझ्यासारख्या अनेकांनी काही स्वप्ने रंगविली होती. देशाच्या भवितव्याबद्दल काही आशा उराशी बाळगल्या होत्या. आज माझ्या देशाची –भारतमातेची भाषा, धर्म, प्रादेशिकता यांच्या नावावर शकले पडू पहात आहेत. भारतमातेची मूर्ती खंडीत होऊ बघत आहे. आणि आपण जाणता की खंडीत मूर्तीची पूजा सुद्धा होऊ शकत नाही. अशावेळी तुम्हा सुशिक्षित तरूणांच्या पुरुषार्थाने भारतमातेचे अखंडत्व साकार व्हावे, तिची अस्मिता टिकावी, व जोपासली जावी व वृद्धिंगत व्हावी एवढीच माझी आपणा सर्वांकडून अपेक्षा आहे. शाबूत हृदय, संगीन बुद्धी, अदम्य मानवनिष्ठा, शुद्ध व असंदिग्ध प्रत्यय असलेला प्राणवान व भावनानिष्ठ तरूण तुमच्या प्रत्येकातून साकार होवो व तशी प्रेरणा अंबाबाई आपण सर्वांस देवो अशी तिच्या चरणी प्रार्थना करतो. तुमचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो आणि तुमचे भावी जीवन आपणा साऱ्यांना व आपल्या देशालाही ललामभूत ठरो, अशी शुभकामना व्यक्त करून हे भाषण संपवितो.

❑❑❑